दि. 05.11.2026

प्रेसनोट

लातूरात मटका बुकींवर पोलीस उप महानिरीक्षक यांच्या पथकाच्या धाडी

13 इसमांविरुद्ध कारवाई, एक लाखांचा मुद्देमाल जप्त

नांदेड परिक्षेत्रांतर्गत, लातूर जिल्ह्यात अवैध व्यवसाय सुरू असल्याबाबतच्या तक्रारी पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांना प्राप्त झाल्या होत्या. त्यावरून, त्यांनी आपल्याकडील अधिकारी व अंमलदारांचे एक पोलीस पथक लातूर जिल्हयात रवाना केले होते.

सदर पथकाने, दिनांक 04.11.2026 रोजी गांधी चौक पोलीस ठाणे हद्दीतील मार्केट यार्ड गेट नंबर 4 समोर प्रिया टि हाऊसच्या बाजूला असलेल्या शटरमध्ये सुरू असलेल्या मटका बुकीवर कारवाई करत, त्या ठिकाणाहून 9,280/-रुपयांची रोकड व 46,000/- रुपयांचे (6) मोबाईल असा एकूण 55,280/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, नमूद प्रकरणात एकूण (8) इसमांविरुध्द कारवाई करुन, त्यांचेविरुध्द गांधी चौक पोलीस ठाणे येथे गुरनं 769/2026 कलम 12 (अ) महाराष्ट्र जुगार कायदयान्वये गुन्हा नोंदविला आहे.

त्याचप्रमाणे, पोलीस ठाणे विवेकानंद चौक हद्दीतील बनसोडे नगर येथे मोकळया जागेत मटका खेळवित व खेळणाऱ्यांविरुध्द कारवाई करत, सदर ठिकाणावरुन 14,950/-रुपयांची रोकड व 30,000/- रुपयांचे (3) मोबाईल असा एकूण 44,950/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, नमूद प्रकरणात एकूण (5) इसमांविरुद्ध कारवाई करुन, त्यांचेविरुध्द विवेकानंद चौक पोलीस ठाणे येथे गुरनं 790/2026 कलम 12 (अ) महाराष्ट्र जुगार कायदयान्वये गुन्हा नोंदविला आहे.

उपरोक्त प्रमाणे, लातूर जिल्ह्यातील (2) कारवायांत, पथकाने एकूण (13) इसमांकडून 24,230/- रुपयांची रोकड व (9) मोबाईल असा एकूण 1,00,230/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदर कारवाईत, पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ/ प्रदिप खानसोळे, पोहेकॉ/ गणेश राठोड, पोहेकॉ/ संदिप वाघाडे व पोहेकॉ/ गजानन डवरे यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन केले आहे.

' खबर ' हेल्पलाइन वरुन माहिती द्या : अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलीसांना पोहोचविता यावी, या दृष्टिकोनातून, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने 91 50 100 100 हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाइन सुरू केली असून, सदर हेल्पलाइन वरून नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयापर्यंत पोहचवावी, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी केले आहे.

पोलीस उप महानिरीक्षक कार्यालय,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड